वाचले १)मऔभां/१/काबि/३४/२०१४, दि. ०७/०२/२०१४

२)प्रशा/२/काबि/७७९/२०१७ दि. २४/१०/२०१७

३)सुधारीत.प्रशा/२/काबि/७९७/२०१७ दि. ०१/११/२०१७

४)प्रशा/२/काबि/ १३१५/ २०२१दि. २५/१०/२०२१

५)मा. आयुक्त सो यांचेकडील दि.२५/११/२०२१रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
मध्यवर्ती औषध साहित्य भांडार
जा.क्र.मऔभां/१/काबि/२३/२०२२
दिनांक – २५/०९ /२०२२

विषय वैदयकिय विभागाअंतर्गत खरेदी करणेत येणा-या औषधे ,साहित्य व उपकरणाकरीता तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना करणेबाबत

आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैदयकिय विभागातंर्गत असणाऱ्या मध्यवर्ती औषध साहित्य भांडारातुन ८ रुग्णालये व २८ दवाखाने यांना औषधे / साहित्य, स्टेशनरी साहित्य, लिनन , साफसफाई साहित्य, लॅब केमिकल, एक्सरे फिल्म ,ऑफिस फर्निचर,हॉस्पिटल फर्निचर व इतर यांचा मागणीनुसार पुरवठा केला जातो. यापुर्वी सर्व दवाखाने / रुग्णालयांना आवश्यक सर्व बाबी खरेदी प्रक्रिया मध्यवर्ती भांडारामार्फत करणे येत होती. परंतु मा. आयुक्त सो यांचे आदेशानुसार सर्व आवश्यक खरेदीचे अधिकार मा. सहा. आयुक्त मध्यवर्ती भांडार यांचेकडे देणेत आले आहेत.

वाचले क्र १ अन्वये सन २०१४-२०१६ करिता खरेदी करणेत येणाऱ्या औषध/साहित्यासाठी "औषधे निविदा समिती" गठीत करण्यात आली होती.

वैद्यकिय विभागाकडील खरेदीबाबतचे अधिकार वाचले क्र २ व ३ चे आदेशान्वये सहाय्यक आयुक्त, मध्यवर्ती भांडार यांचेकडे देण्यात आले आहेत तसेच आरोग्य वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय संचालक, वैद्यकिय व वैद्यकिय अधिक्षक, वाय.सी.एम.एच यांना प्रदान करण्यात आलेले खरेदीचे अधिकार निरस्त करण्यात आले आहेत.या आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या - दवाखाने/रुग्णालये (वैदयकिय विभागाच्या) आवश्यक मागणीनुसार औषध/साहित्य, लिनन , साफसफाई साहित्य, लॅब केमिकल, एक्सरे फिल्म ,ऑफिस फर्निचर,हॉस्पिटल फर्निचर व इतर यांची खरेदी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत करणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) मधील तरतुदींना अनुलक्षुन कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी प्रशासकिय कामकाज शिघ्रतेने व कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम (६९) मधील तरतुदीच्या अर्थातर्गत कामकाज शिघ्रतेने व कार्यक्षमपणे पार पाडण्याच्या दृष्टीने वाचले क्र ४ अन्वये वैदयकिय विभागप्रमुख यांचे कार्यकक्षेच्या मर्यादेत येणारी महानगरपालिका रुग्णालये व दवाखाने येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर उपचार करणेकामी आवश्यक असलेली किरकोळ उपकरणे/साहित्य व सर्व प्रकारच्या औषधांच्या खरेदीकरीता सर्व नियमाधिन विहित कार्यपद्धती अनुसरून रक्कम रुपये १०,००,०००(दहा लाख रुपये फक्त) पर्यत खर्च करण्याचे अधिकार दिले आहेत.

वैदयकिय विभागाच्या दवाखाने/ रुग्णालयासाठी आवश्यक खरेदी तातडीने होणेसाठी तांत्रिक तपासणी समिती गठीत करणेत आली आहे.या समितीमध्ये सर्व रुग्णालयप्रमुख मागणी करणारे तज्ञ डॉक्टर ,बायोमेडिकल इंजिनिअर, व्यवस्थापक यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

खालील प्रमाणे सदस्याची वैदयकिय सल्लागार समितीमध्ये नियुक्ती करणेत आलेली आहे

१) सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी - अध्यक्ष

Scanned with CamScanner

२) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – नविन भोसरी रुग्णालय -सदस्य
३) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी - आकुर्डी रुग्णालय - सदस्य
४) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – भोसरी रुग्णालय - सदस्य
५) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – तालेरा रुग्णायल -सदस्य
६) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – जिजामाता रुग्णालय सदस्य
७) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – सांगवी रुग्णालय सदस्य
८) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी - यमुनानगर रुग्णालय सदस्य
९) जेष्ठ वैद्यकिय अधिकारी – थेरगाव रुग्णालय सदस्य
१०) लेखाधिकारी - वैदयकिय मुख्य कार्यालय
११) बायोमेडिकल इंजिनिअर - वाय.सी.एम. एच
१२) व्यवस्थापक - मध्यवर्ती औषध भांडार

**तांत्रिक तपासणी समितीचे कामकाज व कार्यपदधती खालील प्रमाणे असेल.**

१) दवाखाने/रुग्णालयांकडुन औषध/साहित्य, लिनन , साफसफाई साहित्य, लॅब केमिकल, एक्सरे फिल्म ,ऑफिस फर्निचर,हॉस्पिटल फर्निचर व इतर यांची प्राप्त आवश्यक मागणी एकत्रीत करुन निविदा/कोटेशनसाठी अंतिम मागणी निश्चित करणे, यामध्ये आवश्यकता, दर्जा, प्रकार, परिणामकारकता, नावे इत्यादींचा विचार करुन निर्णय घेणे.

२) मागणी प्रमाणे प्राप्त झालेल्या स्पेसिफिकेशननुसार अंदाजपत्रकिय दरास अभिप्राय देणे.

३) निविदा/कोटेशन प्रक्रीयेतील Technical Evaluation मध्ये प्राप्त कंपन्यांचे कागदपत्रांची छाननी करुन पात्र कंपन्यांची निवड करणे.

४) निविदा/ कोटेशन प्रक्रीयेतील Financial Bid मध्ये प्राप्त होणाऱ्या दरांनुसार आवश्यकता विचारात घेऊन दर स्विकृतीबाबत निर्णय घेणे.

५) औषध/साहित्य, लिनन, साफसफाई साहित्य, लॅब केमिकल, एक्सरे फिल्म ,ऑफिस फर्निचर,हॉस्पिटल फर्निचर व इतर यांचा वापर/ वितरण/ साठा/ परिमाण इत्यादीबाबत निर्णय घेणे.

६) ज्या रुग्णालयाच्या विभागांची मागणी असेल त्यांच्या संबंधित तज्ञ डॉक्टरांना रुग्णालय प्रमुखांनी मिटिंगसाठी उपस्थित राहण्यास सांगावे.

सबब मी अति. आयुक्त (१)पिं.चिं.महानगरपालिका प्रस्तुतच्या आदेशान्वये वरील प्रमाणे वैदयकिय सल्लागार समितीची रचना करण्यास मान्यता देत आहेत.

कोणत्याही औषधे, साहित्य , उपकरणांचे निविदा/ कोटेशन प्रक्रिया राबविताना प्रस्तुत समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. वैदयकिय तज्ञ सल्लागार समितीचे मान्यते शिवाय कोणतीही निविदा/ कोटेशन प्रक्रिया होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

24/1/22

(विकास ढाकणे)
अति. आयुक्त(१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

O/C R.
Rajesh

प्रति,

सर्व संबंधित समिती सदस्य

Scanned with CamScanner